महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, दापोली
दापोली-हर्णे रोड, पेट्रोल पंपासमोर, दापोली ता. दापोली जि. रत्नागिरी
दूरध्वनी व फॅक्स क्रमांक : ०२३५८-२८२०३६, Email : *tah_dapoli@rediffmail.com*

दि.०४/०७/२०१९

क्रमांक/ एलएनए२/२४ X ७ तक्रार/१९

प्रति,

मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी
(महसूल शाखा)

**विषय:-** रत्नागिरी २४ X ७ तक्रार निवारण कक्षात नोंदविलेल्या तक्रारीबाबत.

**संदर्भ:-** आपले कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र १ रत्ना २४ X ७ तक्रार निवारण कक्ष २०१९ दिनांक ११/६/२०१९

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणास कळविणेत येते की, मौजे कॅम्प दापोली येथील स.नं १८... शासकीय जमीन असून त्यामध्ये शर्तभंग झालेला असल्याने मुख्याधिकारी नगरपंचायत दापोली यांना ... कार्यालयाकडून शासकीय वसूलीबाबत नमुना एक ची नोटीस दिनांक २५/१०/२०१८ व नमुना दोन ची नोटीस दिनांक ...१२/२०१८ तलाठी सजा कॅम्प दापोली यांचेमार्फत बजविणेत आलेली आहे आणि र रू. ५२१३७८००/- व नोटीस फी ५/- अशी एकूण र. रू ५२१३७८०५/- इतकी सरकारी खजिन्यात जमा करणेबाबत सुचना देणेत आलेल्या आहेत. सदर पत्रांच्या प्रती सोबत सादर करणेत येत आहेत.

तसेच तलाठी सजा कॅम्प दापोली यांचेमार्फत नोटीस बजाविणेत येवूनही तसेच शर्तभंगाची रक्कम भरणेकरीता कळविणेत आलेले आहे. बराच कालावधी देवूनही मुख्याधिकारी नगरपंचायत दापोली यांनी शासकीय वसूली सरकारी खजिन्यात जमा केलेली नाही अथवा त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. सदर वसूलीबाबत सक्तीची आययोजना म्हणून नगरपंचायत कार्यालयाचे बँक खाते सील का करू नये? याबाबत खुलासा तात्काळ या कार्यालयाकडे सादर करणेबाबत मुख्याधिकारी नगरपंचायत दापोली यांना दिनांक २४/६/२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार सदरची रक्कम वसूल करणेबाबतची कार्यवाही या कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

आपला विश्वासू